# सहसंचालक तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय,

शासकीय तंत्र निकेतन परिसर, गाडगे नगर, अमरावती ४४४ ६०३

E-mail:-roamravati@dtemaharashtra.gov.in Ph.No. :(०७२१) २५७३०२७, २५७२५७७

Website: www.jdroamt.org Fax No. : (०७२१) २५७ ७९१३

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/सीईटी/२०१८/1186

दिनांक :- 19 MAY 2018

प्रति,

**मा.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, अधिष्ठांता (विद्याशाखा),**
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ,
अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशासकरीता पदव्युत्तर पदवी (P.G. Progrrammes) अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबत व सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या सलग्नीकरणाबाबतची माहीती पाठविण्याबाबत.**

**संदर्भ :-** मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा, मुंबई यांचे पत्र क्रमांक :- २अ/एडीएम/प्रवेश प्रक्रिया/२०१८/५९८ दिनांक १५ मे २०१८.

**महोदय,**

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांनी आपणास उद्देशुन लिहीलेले शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरीता पदव्युत्तर पदवी (P.G. Progrrammes) अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबत व सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या सलग्नीकरणाबाबतची माहीती पाठविण्याबाबतचे संदर्भिय पत्र या कार्यालयास प्राप्त झालेले आहे(प्रत सलग्न). कृपया त्याचे अवलोकन करावे. व त्याप्रमाणे कार्यवाही करुन त्याबाबतची माहीती तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांना सादर करावे, व त्याची एक प्रत या कार्यालयास द्यावी, ही विनंती.

**आपला,**

**सहपत्रे :- वरीलप्रमाणे.**

सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :-** १) मा.कुलसचिव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापिठ, अमरावती यांना माहीतीकरीता सादर.

२) प्राचार्य, सर्व अभियांत्रिकी पदव्युत्तर पदवी संस्था, अमरावती विभाग, अमरावती यांना कळविण्यात येते की, सोबत जोडलेल्या संचालनालयाचे संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन करावे व आपणास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता परीषदेने दिलेली मान्यता व विद्यापिठाने दिलेले संलग्निकरण याबाबतच्या पत्राची प्रत संचालनालयाच्या वेबपोर्टलवर तातडीने अपलोड करुन त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

३) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्यासाठी.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.
E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे /कालमर्यादित

क्रमांक : २अ/एडीएम/प्रवेश प्रक्रिया/२०१८/ ५६८
दिनांक : 15 MAY 2018

प्रति,

मा. संचालक,परीक्षा व मूल्यामापन मंडळ, अधिष्ठाता (विद्याशाखा)
मुंबई विद्यापीठ, मुंबई, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, सोलापूर विद्यापीठ , सोलापूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरीता पदव्युत्तर पदवी (P.G.Programmes) अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबत व सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाबाबतची माहिती पाठविण्याबाबत.....

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/पात्रता निकष /२०१८/४१६,दि.०३.०४.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्यामुळे उपरोक्त बाबींवर विचारविनिमय करून आवश्यक तो निर्णय घेण्यासाठी सर्व विद्यापीठाच्या संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि अधिष्ठाता (विद्याशाखा) यांची एकत्रित बैठक दिनांक १२.४.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असून सदर प्रवेश प्रक्रिया बिनचूक व सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या अधिकार क्षेत्रातील कार्यरत संस्था व त्यामध्ये सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाबाबतची माहिती सोबतच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार दि.२१/०५/२०१८ पर्यंत या संचालनालयास उपलब्ध करून देण्यात यावी. सदरची माहिती पाठविताना ज्या संस्थांना विद्यापिठाने Conditional Affiliation दिले असेल अशा संस्थांचा समावेश प्रवेश प्रक्रियेमध्ये करता येणार नाही, याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असल्यामुळे Conditional Affiliation ग्राहय धरण्यात येणार नाही ही बाब विचारात घेऊन विद्यापिठाने Conditional Affiliation दिलेले असेल अशा संस्थांची माहिती पाठविण्यात येऊ नये. संस्थांची संलग्नीकरणाची माहिती विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने भविष्यात त्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यापीठाची राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

तसेच सदर बैठकीत एम ई/एम टेक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबतची माहिती दि.३०/४/२०१८ पर्यन्त संचालनालयास उपलब्ध करून देण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आलेले होते. मात्र बहुतांश विद्यापीठांकडून याबाबतची माहिती अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, तरी आपणांस कळविण्यात येते की, सदरहू माहिती दि.२१/५/२०१८ पर्यन्त या संचालनालयास उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे ज्या विद्यापिठांकडून माहिती उपलब्ध होणार नाही त्यांना संचालनालयाने

शै.वर्ष २०१७-१८ मधील निश्चित केलेले पात्रता निकष मान्य असल्याचे गृहीत धरुन सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया राबविण्यात येईल याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

आपला

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील संबंधित विद्यापिठांकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने आपल्या कार्यालयातील एका अधिकाऱ्यावर जबाबदारी सोपविण्यात यावी व सदर माहिती विहीत मुदतीत या संचालनालयास प्राप्त होईल याची दक्षता घेण्यात यावी तसेच आपल्या नियंत्रणाखालील संबंधित संस्थांना शै.वर्ष २०१८-१९ करीता परीषदेने दिलेली मान्यता व विद्यापिठाने दिलेले संलग्निकरण याबाबतच्या पत्राची प्रत संचालनालयाच्या वेबपोर्टलवर तातडीने अपलोड करण्याकरीता आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

संचालनालयात दिनांक १२.४.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रथम वर्ष एम .ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशासाठी विद्यापीठांमधील अभ्यासक्रमनिहाय पात्रता निकषाबाबत(equivalency of Nomenclature ) यासाठी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रथम वर्ष एम .ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशासाठी अभ्यासक्रमनिहाय पात्रता निकषाबाबत बैठकीला विद्यापीठांमधील उपस्थित असलेल्या अधिका-यांचे उपस्थितीपत्रक सोबत जोडले आहे. सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधींचे उपसंचालक डॉ.आर व्ही शेटकर यांनी स्वागत केले.

श्री वाय आय शाह, विशेष कार्य अधिकारी यांनी बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संचालनालयाकडून राबविण्यात येते. या अभ्यासक्रमाचे प्रवेश AICTE आणि राज्य शासनाने निर्धारीत केलेले पात्रता निकष विचारात घेऊन प्रवेश करण्यात येतात.मात्र प्रवेशित उमेदवार प्रवेश निश्चित करण्यासाठी गेल्यावर विद्यापीठे पात्रता निकष पूर्ण करीत नाहीत या सबबीवर प्रवेश नाकारतात.या बाबी होऊ नयेत म्हणून आजची बैठक बोलाविण्यात आली असे श्री शाह यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधी डॉ.महेश काकडे यांनी ग्रेड सिस्टीमबाबत मुद्दा उपस्थित केला. काही विद्यापीठांकडून ग्रेड सिस्टीम अवलंबण्यात येते तर काही विद्यापीठांकडून मार्क्स सिस्टीम वापरली जाते. यामध्ये एकवाक्यता असावी असे डॉ.काकडे यांनी सूचित केले. त्यावर श्री एन बी पाटील, सिस्टीम ॲनालिस्ट यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत उमेदवारांची पात्रता गुणांवर ग्राहय धरण्यात येते. त्यामुळे ग्रेड सिस्टीम अंगिकारलेल्या विद्यापीठांनी त्यांच्या ग्रेड्सचे गुणांमध्ये Conversion करण्याचा फॉर्म्युला गुणपत्रिकेच्या मागील बाजूवर नमूद करण्याची सूचना केली. तसेच फक्त अंतिम वर्षाचे गुण किंवा प्रथम वर्ष ते अंतिम वर्षाचे गुण यापैकी नेमके कोणते गुण पदवी देताना विचारात घ्यायला पाहिजे याबाबतही स्पष्टता असावयास हवी अशी सूचना केली. सर्व विद्यापीठांनी ती मान्य केली.

पुणे विद्यापीठाच्या डॉ.अशोक चव्हाण यांनी स्वायत्त संस्थांना व विद्यापीठांनाही UGC Nomenclature लागू असल्यामुळे वेगळया अभ्यासक्रमाचा समावेश करता येत नाही ही माहिती बैठकीत दिली.

डॉ.शेटकर यांनी सर्व विद्यापीठांमध्ये प्रवेशात एकवाक्यता असण्याच्या दृष्टीने संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये अवलंबलेले पात्रता निकष या शैक्षणिक वर्षातही अवलंबण्यात यावेत किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी सदर प्रकरणी ज्या विद्यापीठांनी पात्रता निकषांची माहिती संचालनालयास कळविली आहे त्याची नोंद घेण्यात येईल व ज्या विद्यापीठांनी अद्याप पात्रता निकषांची माहिती कळविलेली नाही त्यांनी दिनांक ३०.४.२०१८ पर्यंत संचालनालयास सादर करण्याची विनंती डॉ.शेटकर यांनी केली. उपस्थित सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी त्यास मान्यता दिली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांचे प्रतिनिधींनी Pharmaceutical Chemistry, सारख्या अभ्यासक्रमांमध्ये एम.ई./एम.टेक. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली GATE परीक्षा देण्याची सोय उपलब्ध नाही. त्यामुळे सदर अभ्यासक्रमाच्या पदवी धारक उमेदवारांना एम.ई./एम.टेक.साठी प्रवेश घेता येत नाही. त्यामुळे अशी अर्हता धारण करणा-या उमेदवारांना GPAT परीक्षेच्या गुणांवर प्रवेश देण्याची विनंती केली.राज्यशासनाने

एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी GATE ही प्रवेश परीक्षा अनिवार्य केली असल्याचे डॉ.शेटकर यांनी निदर्शनास आणून दिले तसेच या प्रकरणी विद्यापीठांनी AICTE नवी दिल्ली यांचेकडे पत्रव्यवहार करून अपवादात्मक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी GPAT प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्याबाबत प्रयत्न करावेत अशी सूचना केली. संचालनालयाने यापूर्वीच असा प्रस्ताव AICTE कडे पाठविला असल्याची तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता पात्रतेच्या अधिसूचनेतही बदल प्रस्तावित केलेले आहेत माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली.

एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रता निकषाबाबत सर्व विद्यापीठांच्या प्रतिनिधींना डॉ.सुभाष महाजन,सहसंचालक यांनी मार्गदर्शन केले. तसेच संस्थांना संलग्नता देताना अटीच्या अधीन राहून संलग्नता दिल्यास अशा संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेता येणार नाही ही माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

एम.ई./एम.टेक. अभ्यासक्रमांच्या पात्रता निकषांबाबत सर्व विद्यापीठांनी ३० एप्रिल २०१८ पर्यंत संचालनालयास सर्व विद्यापीठांनी माहिती पाठवावी. ज्या विद्यापीठांकडून माहिती पाठविण्यात येणार नाही त्यांना संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील निश्चित केलेले पात्रता निकष मान्य असल्याचे गृहीत धरण्यात येईल असे डॉ.शेटकर यांनी सांगितले.

पात्रता निकषांच्या संदर्भाने झालेल्या विचारविनिमयानंतर खालील इतर बाबींवरसुध्दा चर्चा झाली.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने संचालनालयामार्फत राबविण्यात येणारी व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार करणे बंधनकारक आहे ही बाब विचारात घेता पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही समांतर कालावधीत राबविणे अनिवार्य आहे ही वस्तुस्थिती सर्व विद्यापीठ प्रतिनिधींच्या निदर्शनास आणण्यात आली. पदवी अभ्यासक्रमांबरोबरच थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रम, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम या सर्वांची प्रवेश प्रक्रिया एकाच कालावधीत राबविली जाणार आहे ही माहिती श्री एन बी पाटील यांनी उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींना दिली. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारीत केल्यानुसार थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची गणना करताना प्रथम वर्षात रिक्त असलेल्या जागा प्रवेशासाठी उपलब्ध करून घेतल्या जातात, त्यामुळे प्रथम वर्षाचा निकाल जाहीर होणे वा ना होणे, तसेच अनुत्तीर्ण होणा-या उमेदवारांच्या जागा प्रवेशासाठी गणना करण्यात येत नसल्यामुळे प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होणार नाही ही बाबही उपस्थितांना स्पष्ट केली.

सर्व विद्यापीठांकडून त्यांच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या संलग्नीकरणाची माहिती प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी संचालनालयाकडे पाठविण्याची विनंती करण्यात आली . ज्या संस्थांना विद्यापीठांनी Conditional Affiliation दिले असेल अशा संस्थांचा समावेश प्रवेश प्रक्रियेत करता येणार नाही. याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत त्यामुळे Conditional Affiliation ग्राह्य धरण्यात येणार नाही ही बाब विचारात घेऊन संलग्नतेची माहिती संचालनालयास कळविण्याची विनंती डॉ.शेटकर यांनी केली. उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

संलग्नतेची माहिती विद्यापीठांनी ऑनलाईन पाठविल्यास ती कामाच्या दृष्टीने आणि प्रशासकीय दृष्टीने सोयीचे होईल ही बाब नमूद करून श्री एन बी पाटील यांनी विद्यापीठांना

Affiliation बाबतची माहिती ऑनलाईन डेटा स्वरूपात देण्याची विनंती केली. त्यास उपस्थित विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

संलग्नतेची माहिती ऑनलाईन डेटा स्वरूपात विद्यापीठांकडून देण्यात येईल मात्र संचालनालयानेसुध्दा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीचा डेटा विद्यापीठांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून दयावा अशी पुणे विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ,अमरावती विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी मागणी केली व इतर सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधींनीही ही मागणी रास्त असल्याचे नमूद केले. त्यावर संचालनालयाकडून अंतिम गुणवत्ता यादी प्रकाशित केल्यानंतर उमेदवारांची माहिती तसेच प्रवेशाच्या कट ऑफ डेटनंतर प्रवेशित उमेदवारांचा डेटा विद्यापीठांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात येईल मात्र सदर माहिती अत्यंत महत्वाची असल्याने त्याची सुरक्षिततेबाबत विद्यापीठांनी योग्य ती काळजी घेण्याची सूचना श्री एन बी पाटील यांनी उपस्थितांना केली. याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य यांचेकडून मान्यता घ्यावी लागेल ही बाबही नमूद केली. त्यावर डॉ.सुभाष महाजन यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांसदर्भात राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया कक्षाकडे उपलब्ध माहितीचा डेटा विद्यापीठांना उपलब्ध करून देण्याबाबत विचार करण्यात येईल असे नमूद केले.

शेवटी उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींचे आभार मानून  दुपारी १.०० वाजता बैठक समाप्त झाली.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


महत्वाचे /कालमर्यादित

क्रमांक : २अ/एडीएम/प्रवेश प्रक्रिया/२०१८/ ५८८

दिनांक : 15 MAY 2018

प्रति,

मा. संचालक,परीक्षा व मूल्यामापन मंडळ, अधिष्ठाता (विद्याशाखा)
मुंबई विद्यापीठ, मुंबई, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर, सोलापूर विद्यापीठ , सोलापूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेशाकरीता पदव्युत्तर पदवी (P.G.Programmes) अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबत व सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संलग्निकरणाबाबतची माहिती पाठविण्याबाबत.....**

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्र. २अ/एडीएम/पात्रता निकष /२०१८/४१६,दि.०३.०४.२०१८

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्यामुळे उपरोक्त बाबींवर विचारविनिमय करून आवश्यक तो निर्णय घेण्यासाठी सर्व विद्यापीठाच्या संचालक,परीक्षा व मूल्यमापन मंडळ आणि अधिष्ठाता (विद्याशाखा) यांची एकत्रित बैठक दिनांक १२.४.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता संचालनालयाच्या समिती सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त सोबत जोडण्यात येत आहे.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असून सदर प्रवेश प्रक्रिया बिनचूक व सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने आपल्या अधिकार क्षेत्रातील कार्यरत संस्था व त्यामध्ये सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाबाबतची माहीती सोबतच्या इतिवृत्तामध्ये नमूद केल्यानुसार दि.२१/०५/२०१८ पर्यंत या संचालनालयास उपलब्ध करून देण्यात यावी. सदरची माहिती पाठविताना ज्या संस्थाना विद्यापिठाने Conditional Affiliation दिले असेल अशा संस्थांचा समावेश प्रवेश प्रक्रियेमध्ये करता येणार नाही, याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले असल्यामुळे Conditional Affiliation ग्राहय धरण्यात येणार नाही ही बाब विचारात घेऊन विद्यापिठाने Conditional Affiliation दिलेले असेल अशा संस्थांची माहिती पाठविण्यात येऊ नये. संस्थांची संलग्नीकरणाची माहिती विहीत मुदतीत प्राप्त न झाल्याने भविष्यात त्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाल्यास त्याची जबाबदारी सर्वस्वी विद्यापीठाची राहील याची कृपया नोंद घेण्यात यावी.

तसेच सदर बैठकीत एम ई/एम टेक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या पात्रता निकषाबाबतची माहीती दि.३०/४/२०१८ पर्यन्त संचालनालयास उपलब्ध करून देण्याबाबत सर्वानुमते ठरविण्यात आलेले होते. मात्र बहुतांश विद्यापीठांकडून याबाबतची माहिती अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेली नाही, तरी आपणांस कळविण्यात येते की, सदरहू माहिती दि.२१/५/२०१८ पर्यन्त या संचालनालयास उपलब्ध करुन देण्यात यावी अन्यथा सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे ज्या विद्यापिठांकडून माहिती उपलब्ध होणार नाही त्यांना संचालनालयाने

शै.वर्ष २०१७-१८ मधील निश्चित केलेले पात्रता निकष मान्य असल्याचे गृहीत धरुन सदर अभ्यासक्रमाची प्रवेश प्रकिया राबविण्यात येईल याचीही कृपया नोंद घेण्यात यावी.

आपला

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत : १. मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागातील संबंधित विद्यापिठांकडून माहिती उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने आपल्या कार्यालयातील एका अधिकाऱ्यावर जबाबदारी सोपविण्यात यावी व सदर माहिती विहीत मुदतीत या संचालनालयास प्राप्त होईल याची दक्षता घेण्यात यावी तसेच आपल्या नियंत्रणाखालील संबंधित संस्थांना शै.वर्ष २०१८-१९ करीता परीषदेने दिलेली मान्यता व विद्यापिठाने दिलेले संलग्निकरण याबाबतच्या पत्राची प्रत संचालनालयाच्या वेबपोर्टलवर तातडीने अपलोड करण्याकरीता आपल्या स्तरावरुन सुचित करण्यात यावे.

संचालनालयात दिनांक १२.४.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता **प्रथम वर्ष** एम .ई./एम.टेक. **पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या** प्रवेशासाठी विद्यापीठांमधील अभ्यासक्रमनिहाय पात्रता निकषाबाबत(equivalency of Nomenclature ) यासाठी आयोजित बैठकीचे इतिवृत्त

प्रथम वर्ष एम .ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठीच्या प्रवेशासाठी अभ्यासक्रमनिहाय पात्रता निकषाबाबत बैठकीला विद्यापीठांमधील उपस्थित असलेल्या अधिका-यांचे उपस्थितीपत्रक सोबत जोडले आहे. सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधींचे उपसंचालक डॉ.आर व्ही शेटकर यांनी स्वागत केले.

श्री वाय आय शाह, विशेष कार्य अधिकारी यांनी बैठकीचा उद्देश स्पष्ट केला. एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संचालनालयाकडून राबविण्यात येते. या अभ्यासक्रमाचे प्रवेश AICTE आणि राज्य शासनाने निर्धारीत केलेले पात्रता निकष विचारात घेऊन प्रवेश करण्यात येतात.मात्र प्रवेशित उमेदवार प्रवेश निश्चित करण्यासाठी गेल्यावर विद्यापीठे पात्रता निकष पूर्ण करीत नाहीत या सबबीवर प्रवेश नाकारतात.या बाबी होऊ नयेत म्हणून आजची बैठक बोलाविण्यात आली असे श्री शाह यांनी स्पष्ट केले.

शिवाजी विद्यापीठाचे प्रतिनिधी डॉ.महेश काकडे यांनी ग्रेड सिस्टीमबाबत मुद्दा उपस्थित केला. काही विद्यापीठांकडून ग्रेड सिस्टीम अवलंबण्यात येते तर काही विद्यापीठांकडून मार्क्स सिस्टीम वापरली जाते. यामध्ये एकवाक्यता असावी असे डॉ.काकडे यांनी सूचित केले. त्यावर श्री एन बी पाटील, सिस्टीम ॲनालिस्ट यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत उमेदवारांची पात्रता गुणांवर ग्राहय धरण्यात येते. त्यामुळे ग्रेड सिस्टीम अंगिकारलेल्या विद्यापीठांनी त्यांच्या ग्रेड्सचे गुणांमध्ये Conversion करण्याचा फॉर्म्युला गुणपत्रिकेच्या मागील बाजूवर नमूद करण्याची सूचना केली. तसेच फक्त अंतिम वर्षाचे गुण किंवा प्रथम वर्ष ते अंतिम वर्षाचे गुण यापैकी नेमके कोणते गुण पदवी देताना विचारात घ्यायला पाहिजे याबाबतही स्पष्टता असावयास हवी अशी सूचना केली. सर्व विद्यापीठांनी ती मान्य केली.

पुणे विद्यापीठाच्या डॉ.अशोक चव्हाण यांनी स्वायत्त संस्थांना व विद्यापीठांनाही UGC Nomenclature लागू असल्यामुळे वेगळ्या अभ्यासक्रमाचा समावेश करता येत नाही ही माहिती बैठकीत दिली.

डॉ.शेटकर यांनी सर्व विद्यापीठांमध्ये प्रवेशात एकवाक्यता असण्याच्या दृष्टीने संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये अवलंबलेले पात्रता निकष या शैक्षणिक वर्षातही अवलंबण्यात यावेत किंवा कसे याबाबत विचारणा केली. त्यावेळी सदर प्रकरणी ज्या विद्यापीठांनी पात्रता निकषांची माहिती संचालनालयास कळविली आहे त्याची नोंद घेण्यात येईल व ज्या विद्यापीठांनी अद्याप पात्रता निकषांची माहिती कळविलेली नाही त्यांनी दिनांक ३०.४.२०१८ पर्यंत संचालनालयास सादर करण्याची विनंती डॉ.शेटकर यांनी केली. उपस्थित सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी त्यास मान्यता दिली.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव यांचे प्रतिनिधींनी Pharmaceutical Chemistry, सारख्या अभ्यासक्रमांमध्ये एम.ई./एम.टेक. अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली GATE परीक्षा देण्याची सोय उपलब्ध नाही. त्यामुळे सदर अभ्यासक्रमाच्या पदवी धारक उमेदवारांना एम.ई./एम.टेक.साठी प्रवेश घेता येत नाही. त्यामुळे अशी अर्हता धारण करणा-या उमेदवारांना GPAT परीक्षेच्या गुणांवर प्रवेश देण्याची विनंती केली.राज्यशासनाने

एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी GATE ही प्रवेश परीक्षा अनिवार्य केली असल्याचे डॉ.शेटकर यांनी निदर्शनास आणून दिले तसेच या प्रकरणी विद्यापीठांनी AICTE नवी दिल्ली यांचेकडे पत्रव्यवहार करून अपवादात्मक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी GPAT प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्याबाबत प्रयत्न करावेत अशी सूचना केली. संचालनालयाने यापूर्वीच असा प्रस्ताव AICTE कडे पाठविला असल्याची तसेच शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता पात्रतेच्या अधिसूचनेतही बदल प्रस्तावित केलेले आहेत माहितीही त्यांनी उपस्थितांना दिली.

एम.ई./एम.टेक. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रता निकषाबाबत सर्व विद्यापीठांच्या प्रतिनिधींना डॉ.सुभाष महाजन,सहसंचालक यांनी मार्गदर्शन केले. तसेच संस्थांना संलग्नता देताना अटींच्या अधीन राहून संलग्नता दिल्यास अशा संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेता येणार नाही ही माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

एम.ई./एम.टेक. अभ्यासक्रमांच्या पात्रता निकषांबाबत सर्व विद्यापीठांनी ३० एप्रिल २०१८ पर्यंत संचालनालयास सर्व विद्यापीठांनी माहिती पाठवावी. ज्या विद्यापीठांकडून माहिती पाठविण्यात येणार नाही त्यांना संचालनालयाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील निश्चित केलेले पात्रता निकष मान्य असल्याचे गृहीत धरण्यात येईल असे डॉ.शेटकर यांनी सांगितले.

पात्रता निकषांच्या संदर्भाने झालेल्या विचारविनिमयानंतर खालील इतर बाबींवरसुध्दा चर्चा झाली.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने संचालनालयामार्फत राबविण्यात येणारी व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया मा.सर्वोच्च न्यायालयाने निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार करणे बंधनकारक आहे ही बाब विचारात घेता पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ही समांतर कालावधीत राबविणे अनिवार्य आहे ही वस्तुस्थिती सर्व विद्यापीठ प्रतिनिधींच्या निदर्शनास आणण्यात आली. पदवी अभ्यासक्रमांबरोबरच थेट द्वितीय वर्ष पदवी अभ्यासक्रम, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम या सर्वांची प्रवेश प्रक्रिया एकाच कालावधीत राबविली जाणार आहे ही माहिती श्री एन बी पाटील यांनी उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींना दिली. तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने निर्धारीत केल्यानुसार थेट द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी रिक्त जागांची गणना करताना प्रथम वर्षात रिक्त असलेल्या जागा प्रवेशासाठी उपलब्ध करुन घेतल्या जातात, त्यामुळे प्रथम वर्षाचा निकाल जाहीर होणे वा ना होणे, तसेच अनुत्तीर्ण होणा-या उमेदवारांच्या जागा प्रवेशासाठी गणना करण्यात येत नसल्यामुळे प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होणार नाही ही बाबही उपस्थितांना स्पष्ट केली.

सर्व विद्यापीठांकडून त्यांच्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या संलग्नीकरणाची माहिती प्रवेश प्रक्रिया सुरू होण्यापूर्वी संचालनालयाकडे पाठविण्याची विनंती करण्यात आली . ज्या संस्थांना विद्यापीठांनी Conditional Affiliation दिले असेल अशा संस्थांचा समावेश प्रवेश प्रक्रियेत करता येणार नाही, याबाबत मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहेत त्यामुळे Conditional Affiliation ग्राहय धरण्यात येणार नाही ही बाब विचारात घेऊन संलग्नतेची माहिती संचालनालयास कळविण्याची विनंती डॉ.शेटकर यांनी केली. उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

संलग्नतेची माहिती विद्यापीठांनी ऑनलाईन पाठविल्यास ती कामाच्या दृष्टीने आणि प्रशासकीय दृष्टीने सोयीचे होईल ही बाब नमूद करुन श्री एन बी पाटील यांनी विद्यापीठांना

Affiliation बाबतची माहिती ऑनलाईन डेटा स्वरूपात देण्याची विनंती केली. त्यास उपस्थित विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी सहमती दर्शविली.

संलग्नतेची माहिती ऑनलाईन डेटा स्वरूपात विद्यापीठाकडून देण्यात येईल मात्र संचालनालयानेसुध्दा प्रवेशित विद्यार्थ्यांच्या माहितीचा डेटा विद्यापीठांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून दयावा अशी पुणे विद्यापीठ, गोंडवाना विद्यापीठ,अमरावती विद्यापीठ आणि सोलापूर विद्यापीठाच्या प्रतिनिधींनी मागणी केली व इतर सर्व विद्यापीठाच्या प्रतिनिधीनीही ही मागणी रास्त असल्याचे नमूद केले. त्यावर संचालनालयाकडून अंतिम गुणवत्ता यादी प्रकाशित केल्यानंतर उमेदवारांची माहिती तसेच प्रवेशाच्या कट ऑफ डेटनंतर प्रवेशित उमेदवारांचा डेटा विद्यापीठांना ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करून देण्यात येईल मात्र सदर माहिती अत्यंत महत्वाची असल्याने त्याची सुरक्षिततेबाबत विद्यापीठांनी योग्य ती काळजी घेण्याची सूचना श्री एन बी पाटील यांनी उपस्थितांना केली. याबाबत राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य यांचेकडून मान्यता घ्यावी लागेल ही बाबही नमूद केली. त्यावर डॉ.सुभाष महाजन यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियांसदर्भात राज्य सामायिक प्रवेश प्रक्रिया कक्षाकडे उपलब्ध माहितीचा डेटा विद्यापीठांना उपलब्ध करून देण्याबाबत विचार करण्यात येईल असे नमूद केले.

शेवटी उपस्थित विद्यापीठ प्रतिनिधींचे आभार मानून दुपारी १.०० वाजता बैठक समाप्त झाली.